

अजित पवार यांच्या हस्ते होणार मान्यवरांचा सन्मान

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | गुरुवार दिनांक 21/08/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 187 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# पुण्यात एकात्मिक दुमजली उड्डाणपुलाचे लोकार्पण

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत औंध ते शिवाजीनगर दरम्यान उभारण्यात आलेल्या एकात्मिक दुमजली उड्डाणपुलाचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौक येथे लोकार्पण करण्यात आले. लोकार्पणानंतर त्यांनी दुमजली उड्डाणपुलाच्या कामांची पाहणी केली.**



यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, आमदार सिद्धार्थ शिरोळे, बापुसाहेब पठारे, हेमंत रासणे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकात पुलकुंडवार, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, पुणे शहरचे सह पोलीस आयुक्त रंजन कुमार शर्मा, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी, मुख्य अभियंता रिनाज पठाण आदी उपस्थित होते.महानगर आयुक्त डॉ. म्हसे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौक येथील एकात्मिक दुमजली उड्डाणपूल (औंध ते शिवाजीनगर) प्रकल्पाबाबत माहिती दिली.पुणे विद्यापीठ चौकामध्ये तसेच गणेशखिंड रस्त्यावरील वाहतूक कोंडीच्या निराकरणासह दिर्घकालीन वाहतूक व्यवस्थापन सुनिश्चित करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौक येथे एकात्मिक दुमजली उड्डाणपुलाची उभारणी करण्यात आली असून यासाठी अंदाजित २७७ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त आहे. या भागातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी तसेच अस्तित्वातील वाहतुकीस पुरेसा रस्ता उपलब्ध व्हावा, म्हणून या दुमजली उड्डाणपुलाची उभारणी करण्यात आली आहे

.या उड्डाणपुलाची एक मार्गिका (औंध -शिवाजीनगर) वाहतुकीसाठी खुली करण्यात आली. शिवाजीनगर व औंध बाजूकडील रॅम्पचे बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित बाणेर व पाषाण बाजूकडील रॅम्पचे बांधकाम ऑक्टोबर २०२५ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन पीएमआरडीएच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

# आधार प्रमाणीकरणातील अडचणींवर उपाययोजना कराव्यात - खा. डॉ. मेधा कुलकर्णी

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

नवी दिल्ली : नागरिकांना आधार प्रमाणीकरणात येणाऱ्या अडचणींबाबत राज्यसभेत बुधवारी खासदार डॉ. मेधा विश्राम कुलकर्णी यांनी सरकारचे लक्ष वेधले. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, शेतकरी व ग्रामीण भागातील मजुरांना या समस्यांचा मोठ्या प्रमाणावर सामना करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. 'आधार हा अडथळा नसून सर्वसमावेशक कल्याणाचा मार्गदर्शक साधन ठरला पाहिजे,' असे डॉ. कुलकर्णी यांनी स्पष्ट केले.



राज्यसभेत विशेष उल्लेख (लक्षवेधी) करताना डॉ. कुलकर्णी म्हणाल्या की, अनेक नागरिकांचे बोटांचे ठसे झिजल्यामुळे, डोळ्यांच्या पडद्यावरील (रेटिनल) समस्या, शारीरिक अडथळे किंवा दीर्घकालीन आजारांमुळे बायोमेट्रिक पडताळणी होत नाही. त्यामुळे त्यांना सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत धान्य, जेष्ठ नागरिकांना मिळणाऱ्या पेन्शन, आरोग्य सुविधा, अगदी बँकिंग सेवांपासूनही वंचित रहावे लागत आहे.

युनिक आयडेंटिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडियाकडून (युआयडीएआय) 'एक्सेप्शनल एनरोलमेंट' आणि चेहरा ओळख (फेशियल रिकग्निशन) तसेच ओटीपी-आधारित प्रमाणीकरण यांसारख्या पर्यायी उपाययोजना उपलब्ध असल्या, तरी त्या प्रत्यक्ष पातळीवर प्रभावीपणे अंमलात आणल्या जात नाहीत, असे त्यांनी नमूद केले. "फ्रंटलाईन कर्मचाऱ्यांना या पर्यायांविषयी माहिती नसते किंवा ते मदत करण्यास अनुत्सुक असतात," असेही त्या म्हणाल्या.

**या उपाययोजना करा: डॉ. कुलकर्णी**

- पर्यायी आधार प्रमाणीकरण पद्धतींची मिशन मोडमध्ये अंमलबजावणी

- बायोमेट्रिक विसंगतीमुळे कोणताही नागरिक कल्याणकारी योजनांपासून वंचित राहू नये याची हमी

- जनजागृती मोहीम व तक्रार निवारण यंत्रणा उभारणे

- प्रत्येक जिल्ह्यात नोडल अधिकारी नेमून तातडीने सोडवणूक सुनिश्चित करणे

# कोरियन भाषेच्या 'टोपिक' परीक्षेसाठी पुण्यात अधिकृत केंद्र

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : कोरियन भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणि व्यावसायिकांसाठी मोठी संधी उपलब्ध झाली आहे. बालेवाडी येथील युथबिल्ड फाउंडेशनच्या आवारात असलेल्या इंडो-कोरियन सेंटरला (आयकेसी) कोरियाच्या शिक्षण मंत्रालयाअंतर्गत नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर इंटरनॅशनल एज्युकेशनच्या (एनआयआयईडी) वतीने 'टोपिक' परीक्षेसाठी अधिकृत टोपिक संस्था व परीक्षा केंद्र म्हणून मान्यता मिळाली आहे.**




त्यामुळे पश्चिम भारतातील एकमेव केंद्र म्हणून पुण्याचा गौरव झाला आहे, अशी माहिती इंडो कोरियन सेंटर व किंग सेजोंग इन्स्टिट्यूटच्या संचालिका डॉ. एउन्जु लिम व इंडो कोरियन सेंटरचे सहसंस्थापक संजीव घटक यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. एउन्जु लिम म्हणाल्या, "कोरियाच्या मुंबईतील वाणिज्य दूतावासाच्या कार्यक्षेत्राखाली कार्यरत असलेल्या इंडो कोरियन सेंटरमार्फत विद्यार्थ्यांना, व्यावसायिकांना आणि कोरियन विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण अथवा रोजगाराच्या संधी शोधणाऱ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता असलेले प्रमाणपत्र मिळणार आहे. १९९७ पासून सुरू असलेली 'टोपिक' परीक्षा ही कोरियन सरकारची अधिकृत भाषा प्रावीण्य चाचणी आहे. वाचन, लेखन आणि श्रवण कौशल्य तपासणारी ही परीक्षा आहे. कोरियन विद्यापीठांमध्ये प्रवेश, कोरियन कंपन्यांमध्ये नोकरी, व्हिसा प्रक्रिया तसेच शैक्षणिक प्रगतीसाठी या परीक्षेचे प्रमाणपत्र महत्वाचे ठरते. 'टोपिक-१' ((प्राथमिक - स्तर १ व २) आणि 'टोपिक-२' (मध्यम व उच्च - स्तर ३ ते ६) असे या परीक्षेचे दोन प्रकार आहेत. या प्रमाणपत्राची वैधता दोन वर्षे असते."

संजीव घटक म्हणाले, "टोपिक ही केवळ भाषा चाचणी नसून, शिक्षण, उद्योग आणि संस्कृती या क्षेत्रांतील कोरिया-भारत सहकार्याला आवश्यक असलेल्या मानवी संसाधन विकासाचे साधन आहे.

इंडो कोरियन सेंटर येथे कार्यरत किंग सेजोंग इन्स्टिट्यूट पुणे येथे कोरियन भाषा अभ्यासक्रम आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीचे कार्यक्रम राबवले जातात. पुढील काळात वर्षातून तीनवेळा 'टोपिक' परीक्षा घेतली जाणार आहे.

तसेच करिअरविषयक शिक्षण व उद्योगसंस्था सहकार्य उपक्रम राबवण्याचा आमचा प्रयत्न आहे. पुणे केंद्रास अधिकृत मान्यता मिळाल्याने कोरियन भाषा शिक्षण आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीसाठी पुणे एक महत्वाचे केंद्र म्हणून उदयास आले आहे. भारतीय विद्यार्थ्यांना कोरियात शैक्षणिक आणि व्यावसायिक संधी साधण्यासाठी नवे मार्ग खुले झाले आहेत."

# पुण्यात शंतनु महेश्वरी आणि अवनीत कौर यांचे भव्य स्वागत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुण्यातील चाहत्यांनी मोठ्या संख्येने गर्दी करून शंतनु महेश्वरी आणि अवनीत कौर यांचे भव्य स्वागत केले. हे दोघे त्यांच्या बहुप्रतिक्षित चित्रपट लव्ह इन व्हिएतनामच्या प्रमोशनसाठी शहरात आले होते. १२ सप्टेंबरला चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणारी ही संगीतमय प्रेमकथा प्रेक्षकांच्या मनाला आधीच भिडली असून, पुण्यातील कार्यक्रमांनी या कलाकारांच्या वाढत्या लोकप्रियतेची साक्ष दिली.**



प्रमोशनल दौऱ्याची सुरुवात शहरातील एका महाविद्यालयात झाली, जिथे विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या गजरात कलाकारांचे स्वागत केले. शंतनु आणि अवनीत यांनी तरुणांशी संवाद साधला आणि चित्रपटातील गाण्यांवर थिरकून वातावरणात रंगत आणली.

त्यामुळे महाविद्यालयाचा परिसर एका छोट्या उत्सवासारखा रंगून गेला.

यानंतरचा कार्यक्रम एका लोकप्रिय पुणे मॉलमध्ये पार पडला, जिथे चाहते कार्यक्रम सुरू होण्याच्या काही तास आधीच पोहोचले होते. कलाकारांचे आगमन होताच चाहत्यांच्या जयघोषाने संपूर्ण मॉल दुमदुमून गेला.

शंतनु आणि अवनीत यांनी उत्साहाने प्रेक्षकांशी संवाद साधला, छायाचित्रे काढली आणि लव्ह इन व्हिएतनामच्या प्रवासाबद्दल मनमोकळेपणाने सांगितले.

मनाला भिडणारी गाणी, प्रभावी कथा आणि शंतनु–अवनीतची बहुचर्चित केमिस्ट्री यामुळे लव्ह इन व्हिएतनाम हा या हंगामातील सर्वात प्रतिक्षित चित्रपट ठरत आहे.

राहत शाह काझमी दिग्दर्शित ही हृदयस्पर्शी संगीतमय प्रेमकथा लव्ह इन व्हिएतनामचे निर्मितीकार्य राहत काझमी फिल्म स्टुडिओज, इनोव्हेशन्स इंडिया, ब्ल्यू लोटस पिक्चर्स यांनी केले असून, झी स्टुडिओज आणि अँड प्रॉडक्शन्स, जेबाईश एंटरटेनमेंट, तारीक खान प्रॉडक्शन्स आणि मँगो ट्री एंटरटेनमेंट

यांच्या प्रस्तुत चित्रपटाचे प्रदर्शन १२ सप्टेंबर २०२५ रोजी होणार आहे.

# रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते 'ध्येयवादी देवेंद्रजी' कॉफी टेबल बुकचे प्रकाशन

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी चिंचवड : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या ध्येयवादी नेतृत्वाखालील कार्याचा गौरव करणारे 'ध्येयवादी देवेंद्रजी' या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन मंगळवारी भाजपा प्रदेश कार्यालयात झाले. भाजपा पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा सरचिटणीस विजय शिंदे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या पुस्तकाचे प्रकाशन भाजपा महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष, मा. श्री. रवींद्रजी चव्हाण यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, "आजचा हा दिवस माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण ज्या नेत्याच्या कार्यामुळे महाराष्ट्राला एक नवी ओळख मिळाली, त्यांच्या कार्यावर आधारित हे कॉफी टेबल बुक साकारण्याचा मान मला मिळाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केवळ विकासाची गती वाढवली नाही, तर समाजातील प्रत्येक घटकापर्यंत विकासाचे लाभ पोहोचवले. त्यांच्या दूरदृष्टीचे, कठोर परिश्रमाचे आणि जनसामान्यांसाठी च्या तळमळीचे दर्शन या पुस्तकातून घडेल अशी माझी खात्री आहे."

यानंतर प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, "हे पुस्तक म्हणजे केवळ देवेंद्रजींच्या कार्याचा आढावा नाही, तर त्यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्राच्या विकासाची गाथा आहे. मुख्यमंत्री म्हणून त्यांनी घेतलेले धाडसी निर्णय, जलयुक्त शिवार सारख्या योजना आणि राज्यातील पायाभूत सुविधांसाठी केलेले कार्य हे सर्व प्रेरणादायी आहे. हे कॉफी टेबल बुक महाराष्ट्राच्या प्रगतीचे प्रतीक असून, भावी पिढ्यांनाही त्यांच्या कार्याची प्रेरणा देत राहील. 'ध्येयवादी देवेंद्रजी' हे पुस्तक महाराष्ट्राच्या ध्येयवादी प्रवासाचा एक महत्त्वाचे दस्तावेज ठरेल."

आमदार अमित गोरखे यांनी मान्यवरांचे स्वागत करून कॉफी टेबल बुकची माहिती दिली. या कॉफी टेबल बुकमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आतापर्यंतच्या राजकीय आणि सामाजिक जीवनातील महत्त्वाच्या टप्प्यांचा वेध घेण्यात आला आहे.

यात त्यांच्या तरुणपणापासून ते मुख्यमंत्रीपदापर्यंतच्या प्रवासातील महत्त्वपूर्ण घटना, त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारने घेतलेले ऐतिहासिक निर्णय, जनसामान्यांसाठी राबवलेल्या कल्याणकारी योजना आणि राज्याच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांनी दिलेल्या योगदानाचा मागोवा घेण्यात आला आहे.

उच्च दर्जाच्या छायाचित्रांनी सुशोभित केलेले हे पुस्तक त्यांच्या प्रशासकीय कौशल्याचे, जनसंपर्काचे आणि ध्येयाप्रती असलेल्या निष्ठेचे बोलके प्रतिबिंब आहे. सावी पब्लिकेशन द्वारे प्रकाशित झालेल्या या पुस्तकाचे संपादन सोयम अस्वार यांनी केले आहे, असे त्यांनी सांगितले.

या प्रकाशन सोहळ्याला महामंत्री तथा आमदार विक्रांत पाटील, महामंत्री विजयभाऊ चौधरी, उत्तर महाराष्ट्र संघटन मंत्री रवींद्र अनासपुरे, मुकुंद कुलकर्णी, आमदार अमित गोरखे, आमदार किसन कथोरे, भाजपा पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे, राजेश पिल्ले, सरचिटणीस विजय शिंदे, नामदेव ढाके, सखी सोबती फाउंडेशनच्या अध्यक्षा गिरीजा शिंदे, अमायरा शिंदे, प्रदेश सदस्य महेश कुलकर्णी, माऊली थोरात, मोरेश्वर शेडगे, चंद्रकांत नखाते, संजीवनी पांडे, राजू दुर्गे, युवा मोर्चा अध्यक्ष राज तापकीर, राम वाकडकर, प्रमोद चौधरी, धनंजय शाळीग्राम, सोयम अस्वार, दीपक नागरगोजे, संतोष शिंदे, कैलास सानप, अजित कुलथे, नेताजी शिंदे, मनोज ब्राह्मणकर यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर १० गुन्हेगार तडीपार

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : शहरात दहशत माजविणाऱ्या दहा गुंडांना तडीपार करण्याचे आदेश परिमंडळ पाचचे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी दिले. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी ही कारवाई केली. पुणे शहर, पिंपरी - चिंचवड आणि पुणे जिल्ह्यातून सराइतांना दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले आहे.लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून अनिकेत गुलाब यादव (वय २२) आणि प्रसाद उर्फ बाबु धनाजी सोनवणे (वय २१) यांना तडीपार करण्यात आले असून त्यांच्या विरोधात दरोडा, जबरी चोरी, बेकायदा शस्त्र बाळगणे असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. कोंढवा पोलीस ठाण्याच्या हद्दीत वास्तव्यास असलेला विश्वजीत भीमराव गायकवाड (वय ४०) हा गावठी दारू विक्री करतो. गायकवाड याला तडीपार करण्यात आले आहे.कोंढवा भागातील गुंड करीम सय्यदअली सौदागर उर्फ लाला (वय २९) आणि त्याचे साथीदार शाहरुख रमजान पठाण उर्फ फतेह (वय २५), अझहर बशीर शेख (वय ३५), अझहर इरफान शेख उर्फ अज्जु (वय २८) यांच्याविरुद्ध मारहाण, धमकी, गंभीर दुखापत, चोरी, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, बेकायदा शस्त्र बाळगणे असे सात गंभीर गुन्हे नोंद दाखल आहेत. या टोळीला तडीपार करण्यात आले आहे.वानवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराइत राहुल उर्फ विकी परदेशी (वय ३५) याच्यासह विशाल राजू सोनकर (वय २६), सुनील रामू परदेशी (वय ३०) यांना तडीपार करण्यात आले. त्यांच्याविरुद्ध गंभीर दुखापत, सरकारी कामात अडथळा निर्माण करणे, विनयभंग, मालमत्तेचे नुकसान, धमकावणे, मारहाण आणि दहशत माजविणे असे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
गुरुवार दिनांक 21/08/2025
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# अजित पवार यांच्या हस्ते होणार मान्यवरांचा सन्मान

## भाऊसाहेब भोईर यांची पत्रकार परिषदेत माहिती

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



चिंचवड : अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखेला ९ ऑगस्ट रोजी २९ वर्षे पूर्ण झाले आहेत. २३ ऑगस्ट २०२५ रोजी पिंपरी-चिंचवड शाखेचा वर्धापनदिन सोहळा संपन्न होणार आहे. यानिमित्ताने दरवर्षी प्रमाणे शाखेच्या नाट्य क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देण्याऱ्या मान्यवरांना "कै. बालगंधर्व', 'कै. स्मिता पाटील', 'कै. आचार्य अत्रे', 'कै. अरुण सरनाईक', 'कै. जयंत दळवी' ई. मान्यवरांच्या नावे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे, तसेच शहरातील स्थानिक कलाकार व रंगमंचावरील विविध तंत्रज्ञ यांना विषेश पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती अ.भा.मराठी नाट्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखा अध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी सुहास जोशी,राजेंद्र बंग,संतोष रासने,संतोष शिंदे,गौरी लोंढे,रुपाली पाथरे आदि मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना भोईर म्हणाले,नाट्य परिषदेच्या वतीने पिंपरी-चिंचवड शहरात नेहमीच सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबवून शहराचे सांस्कृतिक वैभवात भर घालण्याचे कार्य करण्यात येते. शाखेने आजतागायत दोन नाट्य संमेलनाचे यशस्वी आयोजन केले आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहराच्या नावलौकिकात भर पडली आहे. या वर्षीही दि. २३ ऑगस्ट २०२५ रोजी सायं. ५ वा. प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे शाखेच्या २९ व्या वर्धापन दिनानिमित्त पुरस्कार वितरण समारंभ आयोजित केला आहे. यावेळी मा. अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे. तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मध्यवर्ती संघटना, मुंबई चे विश्वस्त मा. अशोक हांडे हे या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# धोकादायक एस.टी.थांबा तात्काळ बंद करा!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



## अन्यथा आंदोलन ; मनसेचा इशारा!

पिंपरी चिंचवड शहरातील निगडी गावठाण परिसरातील कै.मधुकरराव पवळे उड्डाणपुलावर, मारुती मंदिरासमोरील भुयारी मार्गाजवळ एस.टी. महामंडळाच्या बसेस बेदरकार व धोकादायकरीत्या थांबवल्या जातात. येथून प्रवासी धोकादायक पद्धतीने उतरवले जातात व नजीकच असलेल्या उड्डाणपुलाच्या जाळ्या तोडून प्रवासी जीव धोक्यात घालून ये-जा करतात. ही परिस्थिती भविष्यात गंभीर दुर्घटनेला आमंत्रण देणारी असून कोणत्याही क्षणी जीवितहानी होऊ शकते. याकरिता निगडी विभागातील धोकादायक एस.टी. थांबा तात्काळ बंद करून अन्य ठिकाणी स्थलांतरित करावा, अन्यथा एस.टी. महामंडळाच्या अधिकाऱ्यांना काळे फासून आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेना वतीने देण्यात आला आहे.

यासंदर्भात पुणे विभागीय अधिकारी एस टी महामंडळाचे अध्यक्ष कमलेश धणराळे यांना मनसे वतीने निवेदन देण्यात आले, यावेळी शहराध्यक्ष सचिन चिखले , योगेशजी लंगोटे , आकाश कांबळे, जय सकट , अनिल चव्हाण, मयुर खरात हे उपस्थित होते.

दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे कि, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने अनेक वेळा लेखी निवेदनं देवून पाठपुरावा केला आहे. मात्र एस.टी. महामंडळाकडून आजपर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे, सदर धोकादायक एस.टी. थांबा तात्काळ बंद करून अन्य सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावा, अन्यथा एस.टी. महामंडळाच्या अधिकाऱ्यांना काळे फासून निषेध करण्यात येईल, असा इशारा मनसेकडून देण्यात येत आहे.

याच उड्डाणपुलावरून मोठ्या प्रमाणात वाहनांची वाहतूक सुरू असते. काही दिवसांपूर्वी याच ठिकाणी टँकर पलटी झाल्याने मोठा अपघात घडला. याच भागात आधीही झालेल्या अपघातांत अनेकांचे जीव गेलेले आहेत तर काही जणांना आयुष्यभराचे अपंगत्व आलेले आहे. याबाबत रोज नागरिकांच्या, विशेषतः जेष्ठ नागरिक, महिला व लहान मुलांच्या तक्रारी येत आहेत. पूर्वी सर्व एस.टी. बसेस प्रवाशांच्या सोयीसाठी भक्ती-शक्ती चौक येथे थांबत असत. मात्र मेट्रो प्रकल्पाच्या चालू असणाऱ्या कामामुळे आता थेट निगडीतील कै.मधुकरराव पवळे उड्डाणपुलाच्या मध्यभागीच एस टी बस थांबा निर्माण करण्यात आला, ही प्रवाशांच्या जिवाशी खेळणारी व अत्यंत बेजबाबदार कृती आहे. म्हणूनच संबंधित अधिकाऱ्यांनी सदरील ठिकाणी तात्काळ पाहणी करून हा धोकादायक एस.टी. थांबा बंद करून सुरक्षित व योग्य ठिकाणी स्थलांतरित करावा. अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने थेट आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात येईल व एस.टी. महामंडळाच्या अधिकाऱ्यांना काळे फासून जबाबदार धरले जाईल.

विनंतीवजा अंतिम इशारा : या मागणीसंदर्भात मनसेच्या वतीने यापूर्वी तीन वेळा निवेदनं देण्यात आलेली आहेत. हे चौथे व अंतिम निवेदन असून यानंतर कोणताही विलंब झाल्यास थेट कृती करण्यात येईल याची प्रशासनाने नोंद घ्यावी, असे सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579

# पूर बाधित भागातील 1 हजार 127 व्यक्तींचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : अतिवृष्टीमुळे पिंपरी चिंचवड शहरात पूर परिस्थिती उद्भवल्यानंतर आज सायंकाळी ५ वाजेपर्यंत विविध बाधित भागातील ३४० कुटुंबातील १ हजार १२७ व्यक्तींचे महापालिकेच्या आपत्कालीन यंत्रणेकडून सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात आले आहे, अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली. पूर बाधितांसाठी महापालिकेने विविध ठिकाणी निवारा केंद्र तयार केले असून तेथे भोजन, आरोग्यासह आवश्यक सर्व मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच महापालिकेचा आपत्ती नियंत्रण कक्ष २४ तास कार्यान्वित ठेवण्यात आला आहे, असेही त्यांनी सांगितले. पूर ओसरल्यानंतर त्या भागातील साफसफाई युद्धपातळीवर करण्याचे निर्देश देखील आयुक्त सिंह यांनी प्रशासनाला दिले आहेत.



आयुक्त सिंह यांनी शहरातील पूरग्रस्त भागाला तसेच पूरबाधितांना ठेवण्यात आलेल्या निवारा केंद्राला भेट देऊन तेथील पाहणी केली. त्यावेळी आयुक्त सिंह बोलत होते. यावेळी त्यांनी भाटनगर, पिंपरी येथील कै. नवनाथ दगडू साबळे शाळेत तयार करण्यात आलेल्या निवारा केंद्रास भेट देऊन तेथील वस्तुस्थितीची माहिती घेतली. तसेच जुनी सांगवी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शाळेत स्थलांतरित केलेल्या पूरबाधितांशी संवाद साधत त्यांची विचारपूस केली. यावेळी भाटनगर येथे स्थानिक नागरिकांसह क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तर सांगवी येथे माजी महापौर उषा ढोरे, माजी नगरसेवक प्रशांत शितोळे, हर्षल ढोरे, शारदा सोनवणे यांच्यासह सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी तृप्ती सागळे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी पूजा दुधनाळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आदी उपस्थित होते.यानंतर आयुक्त शेखर सिंह यांनी मुळानगर परिसरात वास्तव्यास असलेल्या रहिवासी भागाला भेट देऊन तेथील नागरिकांशी संवाद साधला. तसेच पवना नदीच्या पाणीपातळीचीही पाहणी केली. पावसाचा जोर वाढत असताना तसेच नदीपात्रात धरणातून पाण्याचा विसर्ग वाढण्याच्या सूचना आणि प्रत्यक्ष पाणीपातळी यावर जलद प्रतिसाद पथकांनी बारकाईने लक्ष ठेवावे. पाण्याची धोक्याची पातळी लक्षात घेऊन त्या भागातील नागरिकांना ध्वनीक्षेपकाद्वारे पूर्वसूचना देऊन पूरबाधितांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावे. कोणत्याही परिस्थितीत अनुचित प्रकार घडणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे स्पष्ट निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी प्रशासनाला दिले आहेत.पूर निवारा केंद्राच्या ठिकाणी वैद्यकीय सुविधेसह पथक नेमले आहे. त्यांनी पूरबाधितांची आरोग्य तपासणी करून आवश्यक प्राथमिक उपचार करावेत. भोजन व्यवस्था, पिण्याचे पाणी व इतर मूलभूत सोयीसुविधांची कमतरता राहणार नाही, याची काळजी संबंधित अधिकाऱ्यांनी घ्यावी, अशा सूचना आयुक्त सिंह यांनी दिल्या. पावसाचे वातावरण असल्याने नागरिकांनी उकळून, गाळून पाणी प्यावे. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती लक्षात आल्यास महापालिकेच्या सारथी हेल्पलाईन क्रमांक ८८८८००६६६६, मुख्य नियंत्रण कक्ष क्रमांक ०२०-६७३३११११ / ०२०-२८३३११११ किंवा अग्निशमन विभागाच्या ७०३०९०८९९१ या क्रमांकावर मदतीसाठी संपर्क करावा, असे आवाहन आयुक्त सिंह यांनी यावेळी केले.दरम्यान, काल रात्री नदीकाठच्या नागरिकांना आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली जलद प्रतिसाद पथकांनी क्षेत्रीय अधिकारी यांच्या अधिपत्याखाली निवारा केंद्रात स्थलांतरित केले. रात्री उशीरापर्यंत स्थलांतर करण्याची प्रक्रिया सुरू होती. अतिरिक्त आयुक्त यांनी काल रात्री पिंपरी येथील संजय गांधीनगर,सांगवी येथील मुळानगर व कासारवाडी येथील घाट याठिकाणी पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला.अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी बोपखेलमधील नदीकाठच्या रहिवासी भागाची पाहणी करून तेथील परिस्थितीचा आढावा घेतला. आवश्यकतेनुसार पूरबाधितांना तात्काळ सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी पिंपरी येथील कमला नेहरू प्राथमिक शाळेमध्ये तसेच फुगेवाडी येथे असलेल्या निवारा केंद्रास भेट देऊन स्थलांतरित करण्यात आलेल्या पूरबाधितांशी संवाद साधला.यावेळी महानगरपालिकेतील विविध विभागातील अधिकारी उपस्थित होते.याठिकाणी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी जाधववाडी येथील निवारा केंद्रास भेट देऊन पाहणी करून आवश्यक सूचना दिल्या. क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, आश्विनी गायकवाड, अजिंक्य येळे, अमित पंडित, तानाजी नरळे, अतुल पाटील, किशोर नन्नवरे, पूजा दुधनाळे यांच्या अधिपत्याखाली अनुक्रमे अ, ब, क, ड, इ, फ, ग, ह क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात जलद प्रतिसाद पथके कार्यान्वित करण्यात आली असून आपत्कालीन व्यवस्था हाताळली जात आहे. शिवाय क्षेत्रीय कार्यालयासाठी नेमलेले समन्वय अधिकारी उपायुक्त अण्णा बोदडे, निलेश भदाणे, संदीप खोत यांच्याकडून देखील आपत्कालीन परिस्थितीचे नियंत्रण केले जात आहे. सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल यांच्या अधिपत्याखाली मुख्य नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला असून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

# लग्नाचे आमिष दाखवत महिलेची दहा लाखांची फसवणूक !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : विवाह जुळविण्याच्या संकेतस्थळावरून ओळख झालेल्या एका तरुणाने लग्न करण्याचे आश्वासन देऊन एका महिलेची दहा लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केली. ही घटना २०२३ पासून १९ ऑगस्ट २०२५ पर्यंत पिंपरी येथे घडली.




याप्रकरणी महिलेने पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार एका तरुणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने विवाह जुळविण्याच्या संकेतस्थळावरून मैत्री करून, लग्न करण्याचे आश्वासन दिले.

आरोपीने त्याच्या आई-वडिलांच्या आजारपणाचे आणि वैयक्तिक अडचणींचे कारण सांगून फिर्यादीकडून वेळोवेळी धनादेश, क्रेडिट कार्ड आणि बँकेतून एकूण १४ लाख ४४ हजार ७०० रुपये घेतले.

त्यापैकी ३ लाख ९३ हजार ९१ रुपये परत करून उर्वरित १० लाख ५१ हजार ६०९ रुपये परत न करता, त्याने फिर्यादीशी लग्न करण्यास नकार दिला आणि फसवणूक केली. पिंपरी पोलीस तपास करत आहेत.